सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २७१ | मंगळवार, दि. २३ जून २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१
सोने-चांदी
आजचे भाव
२४ Ct सोने ९९.५०% : ₹ १४७७००
२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १३५३००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ ११३७००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २४४०/-
भाव प्रती १० ग्राम

आजचे अभीष्टचिंतन



डॉ. मंजिरी कुलकर्णी
अमळनेर



श्री. विजय पाटील
अमळनेर



श्री. निर्भय सोनार
अमळनेर



अमळनेर : सोमवार, दि. २२ जून रोजी मुख्याधिकाऱ्यांसोबत होणाऱ्या नियोजित बैठकीसाठी आमदार अनिलदादा पाटील यांच्या निवासस्थानी उपस्थित 'शविआ'चे नगरसेवक व प्रमुख पदाधिकारी.

# 'शविआ'च्या बैठकीला 'खो' देऊन मुख्याधिकारी बदलीसाठी मुंबईला?

## 'शविआ'तर्फे निषेध; आता संयमित भूमिकेऐवजी घेणार आक्रमक पावित्रा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**


अमळनेर : येथील तीव्र पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर सोमवार, दि. २२ जून रोजी दुपारी ४ वाजता शहर विकास आघाडी व प्रमुख पदाधिकारी यांची पालिकेचे मुख्याधिकारी गणेश शिंदे व पालिकेतील सर्व विभागप्रमुखांची बैठक होणार होती. याबाबत 'शविआ'च्या गटनेत्या सौ. जयश्रीताई पाटील यांनी मुख्याधिकाऱ्यांशी फोनवर बोलणी केली होती. पत्रही दिले होते. मुख्याधिकारींनीही पत्रोत्तर देऊन संमती दर्शविली होती. त्याप्रमाणे सोमवारी 'शविआ'चे सर्व नगरसेवक व प्रमुख पदाधिकारी दुपारी साडेतीन वाजता एकत्र जमले. मात्र, त्यावेळी त्यांना कळाले, की मुख्याधिकारी पालिकेत नसून मुंबईला आहेत. विशेष म्हणजे मुंबईला जाण्यापूर्वी त्यांनी सौ. जयश्रीताई पाटील यांना गटनेत्या या नात्याने बैठक पुढे ढकलण्याबाबत लेखी किंवा फोनद्वारे कळविणे गरजेचे होते. मात्र, ते असे काहीही न करता बिनधास्त निघून गेले. दुपारी ४ वाजता सौ. जयश्रीताई पाटील यांनी मुख्याधिकाऱ्यांशी फोनवर बोलणी करून मिळालेल्या अपमानास्पद वागणुकीबद्दल तीव्र नाराजी व संतप्त भावना व्यक्त केल्या.

प्रत्यक्षात मुख्याधिकाऱ्यांच्या विनंतीला मान देऊनच 'शविआ'ने मोर्चाऐवजी बैठकीच्या पर्यायाला मान्यता दिली होती. मात्र, सदर बैठकीत आपले वाभाडे निघतील, या भीतीने मुख्याधिकाऱ्यांनी पलायन करणे उचित समजले असेल. सौ. जयश्रीताई पाटील यांना त्यांनी नगरविकास विभागातून बोलविणे आल्याने मला जावे लागले, असे सांगितले. रविवारी मंत्रालय व सचिवालयाला सुटी असते. असे असताना मुख्याधिकाऱ्यांना मंत्रालय किंवा सचिवालयातून रविवारी कुठून व कोणी कॉल केला असावा, असे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. प्रत्यक्षात अमळनेरच्या पालिकेचे एकूणच वातावरण पाहता येथून निघून गेलेलेच योग्य राहील, अशी त्यांची बऱ्याच दिवसांपासून मानसिकता होतीच. त्यामुळे त्यांच्या निकटवर्तीय सूत्रांनी सांगितले, की ते बदली करून घेण्यासाठीच मुंबईला गेले आहेत.



> ***मुख्याधिकाऱ्यांचे वागणे त्यांच्या पदाला आणि जबाबदारीला शोभणारे नाही. अत्यंत संवेदनशील विषयांबाबतच्या नियोजित बैठकीचे त्यांना गांभीर्य नाही. अचानक जाणे अपरिहार्य होते, असा विचार केला तरी शिष्टाचाराचा व सन्मानाचा भाग म्हणून त्यांनी गटनेत्या या नात्याने मला तोंडी अथवा लेखी कळविणे गरजेचे होते. आमचे सर्व नगरसेवक व पदाधिकारी हातची कामे सोडून बैठकीच्या नियोजित वेळेवर उपस्थित होते आणि हे महाशय मात्र गायब होते. उद्या किंवा परवा येतो, असे त्यांनी मला फोनवर सांगितले आहे. ते आल्यानंतर आमच्या अस्तित्वाची आणि आत्मसन्मानाची जाणीव आम्ही त्यांना निश्चितपणे करून देऊ.***
>
> **– सौ. जयश्रीताई पाटील,** गटनेत्या, 'शविआ'.

## याला काय म्हणावे?



अमळनेर : येथील पानखिडकी भागात रविवार, दि. २१ जून रोजी आढळून आलेले घाणीचे साम्राज्य. (छायाचित्र : रजनीकांत पाटील)

## 'खोटे बोला पण रेटून बोला'

# उपनगराध्यक्ष निकम हे 'स्टंटबाज'

## जितेंद्र ठाकूर यांचा पलटवार; जलकुंभ स्वच्छतेबाबतचे दावे फेटाळले, पालिकेचे रेकॉर्ड तपासण्याचा सल्ला

### २०१४ मध्येच झाली जलकुंभाची स्वच्छता; '२४ वर्षे नाही', दावा खोटा



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : पालिकेच्या पाण्याच्या टाकीत उतरून व्हिडिओ बनवत गेल्या २२ ते २४ वर्षांपासून जलकुंभांची स्वच्छता झालेली नसल्याचा दावा करणारे उपनगराध्यक्ष प्रशांत निकम हे निव्वळ 'स्टंटबाज' असून त्यांनी पालिकेचा इतिहास आणि वस्तुस्थिती जाणून घ्यावी, असा घणाघात विरोधी गटाच्या वतीने जितेंद्र ठाकूर यांनी केला आहे. शहर विकास आघाडीने अनियमित व दूषित पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावर आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर स्वतःच्या अपयशावर पांघरूण घालण्यासाठी निकम यांनी नवीन स्टंट सुरू केल्याचा आरोपही त्यांनी निवेदनातून केला आहे.

ठाकूर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, की शहर विकास आघाडीने शहरातील दूषित पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावर दि. २२ जून रोजी मोर्चा काढण्याचा इशारा दिला होता. मात्र, प्रशासनाच्या विनंतीवरून आणि शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न लक्षात घेऊन मोर्चा स्थगित ठेवत चर्चेला प्राधान्य देण्यात आले. यानंतर उपनगराध्यक्ष निकम यांनी शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या जलकुंभांची २४ वर्षांपासून स्वच्छता झालेली नसल्याचा दावा केला. हा दावा वस्तुस्थितीला धरून नसून जनतेची दिशाभूल करणारा असल्याचे ठाकूर यांनी म्हटले आहे. अमळनेर शहरात एकूण सात पाण्याच्या टाक्या आहेत. त्यापैकी झामी चौकातील टाकी सध्या पाडण्यात आली आहे तसेच कोर्टामागील आणि लालबाग येथील अशा एकूण तीन टाक्या १९९८ मध्ये जीवन प्राधिकरणाकडून पालिकेकडे हस्तांतरित झाल्या होत्या. तत्कालीन नगराध्यक्षा सौ. जयश्रीताई अनिल पाटील यांच्या कार्यकाळात (२७ डिसेंबर २०११ ते ५ जुलै २०१४) तत्कालीन मुख्याधिकारी सोमनाथ शेटे यांच्या मार्गदर्शनाखाली या टाक्यांची व्यापक स्वच्छता मोहीम राबविण्यात आली होती. त्यावेळी टाक्यांमधून मोठ्या प्रमाणात गाळ काढण्यात आल्याचा दावा करत निकम यांचा २४ वर्षांचा दावा धादांत खोटा असल्याचे ठाकूर यांनी म्हटले. याच कार्यकाळात ढेकू रोडवरील लक्ष्मीनगर, पैलाड आणि मुंदडानगर, रामवाडी, तांबेपुरा येथील अशा ५ नवीन जलकुंभांचे बांधकाम पूर्ण होऊन १ मार्च २०१४ रोजी त्यांचे लोकार्पण तत्कालीन खासदार ए. टी. पाटील, नगराध्यक्षा सौ. जयश्रीताई पाटील आणि आमदार अनिलदादा पाटील यांच्या उपस्थितीत झाल्याचेही त्यांनी नमूद केले. तसेच प्रशासकीय काळात तांबेपुऱ्यातील पाचवी टाकी उभारण्यात आल्याची माहिती दिली.

शहर विकास आघाडीने पाणीप्रश्नावर आंदोलनाचा इशारा दिल्यानंतरच उपनगराध्यक्षांना टाक्यांची आठवण झाली का? असा प्रश्न उपस्थित करत गेल्या. सहा महिन्यांपासून सत्ता हातात असताना त्यांनी काय केले, याचे उत्तर जनतेला द्यावे, अशी मागणी ठाकूर यांनी केली. मोर्चाच्या भीतीपोटी टाकीत उतरून प्रसिद्धी मिळविण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

सन २०१४ नंतर विविध नगराध्यक्ष व प्रशासकीय कार्यकाळात टाक्यांची स्वच्छता का झाली नाही, याचा जाब विचारण्याचे धाडस प्रशांत निकम यांनी दाखवावे, असे आव्हान ठाकूर यांनी दिले आहे. माजी आमदार शिरीषदादा चौधरी यांच्या कार्यकाळात माजी नगराध्यक्षा सौ. भारतीताई चौधरी, माजी आमदार कृषिभूषण साहेबराव पाटील, नगराध्यक्षा सौ. पुष्पलताताई पाटील तसेच प्रशासकीय यांच्या कार्यकाळाचा उल्लेख करत त्यांनी केवळ निवडक व्यक्तींवर आरोप करण्याऐवजी आत्मपरीक्षण करण्याचा सल्ला दिला.

प्रशांत निकम यांनी जनतेची दिशाभूल करणे थांबवून शहरातील विस्कळीत पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावर ठोस काम करावे. नैतिकतेची जाणीव असेल तर लोकांच्या जिवाशी खेळणे थांबवून पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणीही ठाकूर यांनी निवेदनातून केली आहे.

गर्व से कहो स्वदेशी है हम...!
स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!

# मंत्री महाजन यांचे मॉर्फ फोटो प्रसारित करणाऱ्यांवर कठोर कारवाई करा

## खासदार स्मिताताई वाघ यांची मागणी; अमळनेर पोलिसांना निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राज्याचे जलसंपदामंत्री ना.गिरीश महाजन यांचे कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा वापर करून मॉर्फ केलेले फोटो सोशल मीडियावर प्रसारित करून बदनामी करण्यात येत असल्याचा आरोप करत संबंधितांवर गुन्हे दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी खासदार श्रीमती स्मिताताई वाघ यांच्यासह भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी पोलिस निरीक्षक दत्तात्रय निकम यांच्याकडे सोमवार, दि. २२ जून रोजी

पान २ वर



अमळनेर : जलसंपदामंत्री ना. गिरीश महाजन यांचे मॉर्फ फोटो प्रसारित करणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी, या मागणीचे निवेदन सोमवार, दि. २२ जून रोजी पोलीस निरीक्षक निकम यांच्याकडे देताना खासदार श्रीमती स्मिताताई वाघ यांच्यासह जिजाबराव पाटील, राहुल पाटील, शहराध्यक्ष महाजन, डॉ. अनिल शिंदे, ॲड. व्ही. आर. पाटील, गिरीश पाटील, प्रफुल पवार, हिरालाल पाटील, जितेंद्र पाटील, देवाभाऊ लांडगे, विजय राजपूत, अमोल पाटील, राहुल चौधरी, भरतसिंग परदेशी, श्रीनिवास मोरे, भारती सोनवणे, माधुरी पाटील यांच्यासह कार्यकर्ते.

# जिनगर गल्लीत घरफोडी; पावणेनऊ लाखांचे दागिने लांबवले

## घरमालक साखरपुड्यासाठी बाहेरगावी गेल्याने चोरट्यांनी साधली संधी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : घरमालक साखरपुड्याला गेल्याचा फायदा घेत तिसऱ्या मजल्यावरील घराचे कुलूप तोडून चोरट्यानी घरातील कपाट तोडून सुमारे आठ लाख ६६ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने लंपास केले. ही घटना रविवार, दि. २१ जून रोजी सकाळी उघडकीस आली.

या घटनेबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की छगन चुडामन बिऱ्हाडे (रा. एकतानगर, जिनगर गल्ली, अमळनेर) हे पुतण्याचा साखरपुडा असल्याने घराला कुलूप लावून शनिवारी, दि. २० जून रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास सुरत येथे गेले होते. त्यानतर रविवार, दि. २१ जून रोजी सकाळी आठ वाजता मंगलाबाई रतीलाल बिऱ्हाडे यांनी त्यांना फोन करून सांगितले, की तुमच्या घरातील दुसऱ्या आणि तिसऱ्या मजल्यावरील घराचे कुलूप तुटलेल्या अवस्थेत आहे. दरवाजेही संपूर्णपणे उघडे आहेत. त्यामुळे घरात चोरी झाल्याचे समजताच छगन बिऱ्हाडे दुपारी अडीचपर्यंत अमळनेर येथे पोहोचले. त्यानंतर त्यांनी घराची पाहणी केली असता तळमजल्यावरील कुलूप जसेच्या तसे होते. ते उघडून आत प्रवेश केला असता दुसऱ्या आणि तिसऱ्या मजल्यावर ठेवलेल्या कपाटाचे लॉक तोडलेले दिसून आले आणि त्यातील दागिने लंपास झालेले दिसले. तसेच घरातील ४,८०० रुपयांची अर्धा ग्रॅम वजनाची लहान बाळाची सोन्याची रिंग, तीन लाख ६० हजार ७८८ रुपयांची २५.१८ ग्रॅम वजनाची सोनसाखळी, ७३ हजार ९९७ रुपयांची ५.०७ ग्रॅम वजनाची सोनसाखळी व पेंडल, एक लाख ३३ हजार २५२ रुपयांची ९.३४ ग्रॅम सोनसाखळी, २१ हजार ४५५ रुपयांचे १.४७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र, वाट्या, ४१ हजार

पान २ वर



अमळनेर : घरफोडीची माहिती मिळताच घटनास्थळी पोहोचून पाहणी करताना विभागीय पोलीस अधिकारी विनायक कोते.

## संपादकीय

# बदलत चाललेली संस्कृती अन् कौशल्य

मुंबईत साठच्या दशकात कापड गिरण्यांच्या बरोबरीने इंजिनिअरिंग उद्योग मोठ्या प्रमाणावर उभे राहायला सुरूवात झाली तीच मुळी बकाली व त्या अनुषंगाने येणाऱ्या गुन्हेगारीसोबत. या पार्श्वभूमीवर शिवसेना ही संघटना उभी राहिली. शिवसेनेचा साठावा वर्धापन दिन दोन्ही शिवसेनांनी दरवर्षीप्रमाणे साजरा केला. यात उद्धव ठाकरे यांच्या मेळाव्यावर सहा खासदारांच्या फुटीचे सावट होते. उद्धव या फुटीवरून निर्वाणीचे बोलले. 'माझ्यावर तुमचा विश्वास नसेल शिवसेना पक्षप्रमुखपद मी सोडतो. एखाद्या नव्या दमाच्या सामान्य शिवसैनिकाकडे हे पद द्या,' असे आवाहनही त्यांनी केले. शिवसैनिक हा भावनिक असतो. नेत्याच्या आदेशावर जीव ओवाळून टाकणारा असतो. अशा तरुणांचेच संघटन बाळासाहेब ठाकरे यांनी साठ वर्षांपूर्वी उभे केले. त्यामुळे बाळासाहेबांच्या हयातीत छगन भुजबळ, गणेश नाईक, राज ठाकरे, नारायण राणे आदी नेत्यांची बंडखोरी झाली तरी त्या घटना सरळपणे झाल्या नव्हत्या. शिवसैनिकांचा रोष त्यांना सहन करावा लागला होता. आता ती परिस्थिती नाही. षण्मुखानंद सभागृहात उद्धव यांनी उपस्थितांना भावनिक आवाहन केले. केंद्रातील सत्तेच्या जीवावर फोडाफोडीचे जे राजकारण सुरू आहे, त्याच्यासमोर उभे राहावे लागेल, ऑपरेशन कमळ राबवावे लागेल, असा जोश उपस्थितांमध्ये भरू पाहिला; मात्र त्याचा परिणाम किती होईल हा मोठाच प्रश्न आहे. त्याच वेळी गोरेगावच्या नेस्को येथे एकनाथ शिंदे त्यांच्या मेळाव्यात उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला थेट आव्हान देत होते. 'वाघ एकटा येतो, कुत्री भुंकतात' वगैरे ते उबाठाला डिवचत होते.

सहा खासदारांच्या फुटीबाबत शिंदे यांनी मेळाव्यात थेट काहीही बोलणे टाळले. मात्र, 'ये तो ट्रेलर है पिक्चर अभी बाकी है' असे म्हणत शिवसेना (उबाठा) पक्षात केवळ उभी नाही; तर सगळ्याच बाजूंनी जोरदार फूट घडवणार, असा शिवसेना संस्कृतीतला आवाज त्यांनी उद्धव यांना दिला आहे. सिनेमात राजेश खन्नाचा काळ जाऊन अमिताभ बच्चन हीरो होण्याच्या काळात शिवसेनेला बहर आला. कामगारांच्या वस्त्यांमध्ये बेकार तरुणांचे लोंढेही वाढू लागले. छोट्या मोठ्या कारणांवरून होणाऱ्या मारामाऱ्या हे मुंबईच्या लालबाग, परळ, घोडपदेव वगैरे विभागाचे वैशिष्ट्य. मारामारी सुरू होण्यापूर्वी तरुणांचा घोळका दुसऱ्या घोळक्यासमोर जाऊन 'आव्वाज' असे ओरडून आव्हान देत असे. बाळासाहेबांना येथील 'लुम्पेन प्रॉलितरिएत'ची भाषा चांगली अवगत होती. त्याचीच त्यांनी घोषणा केली. अमिताभ स्टाईल 'तिथल्या तिथे न्याय' हे सेनेचे सूत्र होते. त्यामुळे शिवसेना तरुणांमध्ये प्रचंड लोकप्रिय झाली. बाळासाहेब हे एकमेव नेते व त्यांचा आदेश म्हणजे अंतिम. त्या आदेशाबाबत विवेकाने विचार वगैरे अशक्य. शिवसेनेच्या जन्मापासून उद्धव ठाकरे हे त्याचे साक्षीदार असले तरी त्यांची सांस्कृतिक जडणघडण सामान्य शिवसैनिकाप्रमाणे झालेली नाही, हे लक्षात घ्यावे लागेल. नव्या आर्थिक धोरणामुळे अर्थकारणाबरोबरच समाजाची सांस्कृतिक वीण पूर्णपणे बदलून गेली. राजकारणात पैशाचे महत्त्व अतोनात वाढले. आता केवळ नेतेच नाही तर कार्यकर्तेही व्यावसायिक विचार करू लागले आहेत. एकनाथ शिंदे यांच्या यशाचे मोजमाप करताना या बाबीही लक्षात घ्याव्या लागतील.

जनतेचे प्रश्न सोडवणे म्हणजे बहुतांश वेळा रोख रक्कम देऊन जनतेला नमस्कार करणे हे सोपे उत्तर काळानुरूप लोकप्रतिनिधींनी शोधले आहे. पैशांची सोय करण्याच्या विवंचनेत लोकप्रतिनिधी कायम असतात. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे राजीव गांधी यांनी १९८५ मध्ये जो पक्षांतर बंदी कायदा आणला त्याबाबत ज्येष्ठ समाजवादी नेते व विचारवंत मधू लिमये यांचा जो आक्षेप होता, त्यातही या फुटीचे कारण लपलेले आहे. या कायद्यानंतर संसद वा विधिमंडळातील प्रतिनिधी वैयक्तिक विवेकाला जागू शकणार नाहीत, ते पक्षप्रमुखाने नेमलेल्या व्हिपचे गुलाम होतील व त्यांची वैधता पूर्णपणे अध्यक्षाच्या हातात जाईल, हे लिमयेंचे म्हणणे तंतोतंत खरे ठरले. पक्षांतर्गत लोकशाहीचा ऱ्हास व पैसा हेच लोकांचे प्रश्न सोडवण्याचे माध्यम झाल्याने संसदीय पक्षातील दोन तृतीयांश सदस्य फुटण्याचा अडथळाही सहज पार होऊ लागला. त्यात न्यायालयानेही संघटनेतील फुटीपेक्षा संसदीय पक्षातील फूटच ग्राह्य मानल्याने छोट्या पक्षांची मोठीच पंचाईत झालेली आहे. एकूणात शिवसेना उबाठाचे खासदार फुटल्याने माध्यमांमधील चर्चांपलीकडे राजकीय पाण्यावर तरंग उमटण्याची शक्यता कमीच. आवाज देण्याची क्षमता दोन्ही बाजूंनी गमावल्यासारखीच आहे. घाऊक संख्येने फोडण्याची व फुटून निघण्याची क्षमता हे मात्र लोकप्रतिनिधींनी आत्मसात केलेले नवे कौशल्य आहे, हे मात्र मान्य करावेच लागेल.

## जिनगर गल्लीत घरफोडी

**पान १ वरून :** ३०४ रुपयांचे २.८३ ग्रॅम वजनाच्या कानातील बाळ्या, दोन लाख तीस हजार ४७२ रुपये किमतीच्या ३५ ग्रॅम वजनाचा चपलाहार असा एकूण आठ लाख ६६ हजार ६८ रुपयांचा ऐवजे चोरट्यांनी लंपास केला, जिनगर गल्ली इतकी निमुळती आणि दाट वस्तीची असल्याने चोरी होणे अशक्य होते. मात्र, तळमजल्यावरील कुलूप जसेच्या तसे असल्याने चोरट्यांनी शेजारील घराच्या छतावरून या इमारतीत प्रवेश केला असावा. घटनास्थळी विभागीय पोलीस अधिकारी विनायक कोते, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, उपनिरीक्षक काकळीज, पोलीस शिपाई नामदेव बोरकर, निलेश मोरे, शेखर साळुंखे, विनोद संदानशिव, गणेश पाटील, उज्ज्वल पाटील, नितीन मनोरे यांनी तत्काळ भेट दिली. त्याचप्रमाणे जळगाव स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पथक, श्वानपथक, ठसेतज्ज्ञ यांनीही घटनास्थळी भेटी दिल्या. कपाटावरील चोरट्यांचे ठसे मिळून आले असून पोलिसांनी त्यांचे नमुने घेतले आहेत. या घटनेबाबत अमळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक शरद काकळीज तपास करीत आहेत.

## मॉर्फ फोटो प्रसारित करणाऱ्यांवर कारवाई करा

**पान १ वरून :** निवेदनाद्वारे केली. त्यात म्हटले आहे, की गेल्या दोन-तीन दिवसांपासून मंत्री महाजन यांचे मॉर्फ केलेले फोटो सोशल मीडियावरील विविध प्लॅटफॉर्मवर काही उपद्रवी व्यक्तींमार्फत प्रसारित केले जात आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा गैरवापर करून एका राजकीय व्यक्तिमत्त्वाची प्रतिमा मलिन करण्याचा हा प्रयत्न असून, यामागील संबंधित व्यक्तींचा शोध घेऊन त्यांच्यावर तातडीने गुन्हे दाखल करावेत. तसेच अशा प्रकारचे फोटो प्रसारित करणाऱ्यांसह ते जाणूनबुजून लाईक, शेअर अथवा व्हायरल करणाऱ्या बेजबाबदार व्यक्तींविरुद्धही कायदेशीर कारवाई करावी. समाजात दिशाभूल करणारी व द्वेषपूर्ण माहिती पसरविणाऱ्या प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी पोलिस प्रशासनाने कठोर भूमिका घ्यावी.

यावेळी जानवे मंडळ अध्यक्ष जिजाबराव पाटील, पातोंडा मंडळ अध्यक्ष राहुल पाटील, शहराध्यक्ष योगेश महाजन, डॉ. अनिल शिंदे, माजी जिल्हा परिषद सदस्य ॲड. व्ही. आर. पाटील, गिरीश पाटील, बाजार समितीचे संचालक प्रफुल पवार, हिरालाल पाटील, जितेंद्र पाटील, राहुल पाटील, देवा लांडगे, विजय राजपूत, अमोल पाटील, राहुल चौधरी, भरतसिंग परदेशी, श्रीनिवास मोरे, भारती सोनवणे, माधुरी पाटील यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रनिष्ठ विचारांचे प्रणेते : डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय राजकारणातील एक महत्त्वपूर्ण दिवस म्हणजे २३ जून. याच दिवशी १९५३ मध्ये भारताच्या एकात्मतेसाठी आणि राष्ट्रहितासाठी अखंड संघर्ष करणारे प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ, दूरदर्शी राजकारणी, राष्ट्रवादी विचारवंत आणि भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचे निधन झाले. त्यांचा आज स्मृतिदिन. हा केवळ एका नेत्याच्या आठवणींचा दिवस नसून राष्ट्र एकात्मता, सांस्कृतिक राष्ट्रवाद आणि लोकशाही मूल्यांप्रती त्यांच्या योगदानाचे स्मरण करण्याचा दिवस आहे.

**प्रारंभिक जीवन आणि शिक्षण**

डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचा जन्म ६ जुलै १९०१ रोजी कोलकाता येथे झाला. त्यांचे वडील सर आशुतोष मुखर्जी हे प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ आणि कोलकाता विद्यापीठाचे कुलगुरू होते. घरातील शैक्षणिक आणि वैचारिक वातावरणामुळे श्यामाप्रसाद यांच्यावर लहानपणापासूनच विद्वत्तेचे संस्कार झाले. त्यांनी कोलकाता विद्यापीठातून उच्च शिक्षण घेतले. कायद्याचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर ते इंग्लंडला गेले आणि तेथून बॅरिस्टर झाले. त्यांच्या असामान्य बुद्धिमत्तेमुळे आणि शैक्षणिक क्षमतेमुळे अवघ्या ३३ व्या वर्षी ते कलकत्ता विद्यापीठाचे कुलगुरू बनले. या पदावर नियुक्त होणारे ते त्या काळातील सर्वांत तरुण कुलगुरू होते.

**शिक्षण क्षेत्रातील योगदान**


डॉ. मुखर्जी यांनी भारतीय शिक्षणव्यवस्थेत राष्ट्रीयतेचा दृष्टिकोन आणण्याचा प्रयत्न केला. त्यांनी भारतीय भाषा, संस्कृती आणि परंपरांना शिक्षणात योग्य स्थान मिळावे यासाठी प्रयत्न केले. विद्यापीठ प्रशासनात आधुनिकता आणि भारतीय मूल्यांचा समन्वय घडवून आणण्याचे कार्य त्यांनी केले. त्यांच्या कार्यकाळात उच्च शिक्षणाच्या गुणवत्तावृद्धीसाठी अनेक सुधारणा राबविण्यात आल्या. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय चेतना निर्माण करण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले.

**राजकारणातील प्रवेश**

१९२९ मध्ये ते बंगाल विधान परिषदेत निवडून आले. प्रारंभी ते काँग्रेसच्या विचारांशी सहानुभूती बाळगत होते; परंतु पुढे बंगालमधील राजकीय परिस्थिती आणि हिंदू समाजाच्या प्रश्नांमुळे त्यांनी स्वतंत्र राजकीय भूमिका स्वीकारली. १९४१ मध्ये ते बंगाल सरकारमध्ये अर्थमंत्री झाले. त्या काळात त्यांनी प्रशासनातील कार्यक्षमता, आर्थिक नियोजन आणि जनहिताच्या प्रश्नांवर ठोस भूमिका घेतली.

**फाळणीच्या काळातील भूमिका**

भारताच्या फाळणीच्या काळात बंगाल आणि पंजाबमधील हिंदू समाजाच्या सुरक्षेचा प्रश्न अत्यंत गंभीर होता. डॉ. मुखर्जी यांनी पश्चिम बंगाल भारतात राहावा यासाठी प्रभावी आंदोलन आणि राजकीय प्रयत्न केले. त्यांच्या ठाम भूमिकेमुळे



**स्मृतिदिन विशेष**

पश्चिम बंगालचा मोठा भाग भारतात राहू शकला, असे अनेक इतिहासकार मानतात. देशाच्या विभाजनामुळे निर्माण झालेल्या मानवी संकटांबाबत त्यांनी सातत्याने आवाज उठविला. विस्थापितांच्या पुनर्वसनासाठी त्यांनी केंद्र सरकारवर दबाव आणला.

**स्वतंत्र भारताचे पहिले उद्योगमंत्री**

स्वातंत्र्यानंतर पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मंत्रिमंडळात डॉ. मुखर्जी यांची उद्योग आणि पुरवठा मंत्री म्हणून नियुक्ती झाली. त्यांनी भारताच्या औद्योगिक विकासाचा पाया मजबूत करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या कार्यकाळात देशातील औद्योगिक प्रगतीसाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. स्वदेशी उद्योगांना चालना देणे, औद्योगिक स्वावलंबन वाढविणे आणि रोजगारनिर्मिती यावर त्यांनी भर दिला.

**भारतीय जनसंघाची स्थापना**

२१ ऑक्टोबर १९५१ रोजी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी भारतीय जनसंघाची स्थापना केली. भारताच्या सांस्कृतिक राष्ट्रवादावर आधारित राजकारणाची पायाभरणी त्यांनी केली. पुढे हाच जनसंघ विकसित होत भारतीय जनता पक्षाच्या स्थापनेचा आधार ठरला. जनसंघाच्या माध्यमातून त्यांनी राष्ट्रीय एकात्मता, सुशासन, स्वावलंबन आणि सांस्कृतिक अभिमान या मूल्यांचा प्रचार केला.

**जम्मू-काश्मीर प्रश्नावरील संघर्ष**

डॉ. मुखर्जी यांच्या सार्वजनिक जीवनातील सर्वांत उल्लेखनीय संघर्ष म्हणजे जम्मू-काश्मीरच्या विशेष दर्जाविरोधातील आंदोलन. त्यांचा ठाम विश्वास होता की एका देशात दोन संविधान, दोन प्रधान आणि दोन निशाण असू शकत नाहीत.त्यांनी प्रसिद्ध घोषणा दिली की 'एक देश में दो विधान, दो प्रधान और दो निशान नहीं चलेंगे.' १९५३ मध्ये जम्मू-काश्मीरमध्ये प्रवेश करण्यासाठी त्यांनी परवानगी व्यवस्थेला विरोध केला. आंदोलनादरम्यान त्यांना अटक करण्यात आली आणि श्रीनगर येथे नजरकैदेत ठेवण्यात आले.

**रहस्यमय मृत्यू**

२३ जून १९५३ रोजी नजरकैदेत असताना त्यांचे निधन झाले. त्यांच्या मृत्यूभोवती अनेक प्रश्न उपस्थित झाले आणि त्याबाबत चौकशीची मागणीही करण्यात आली. त्यांच्या निधनाने भारतीय राजकारणाला मोठा धक्का बसला.

**विचार आणि वारसा**

डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचे संपूर्ण जीवन राष्ट्रहित, राष्ट्रीय एकात्मता आणि सांस्कृतिक अस्मिता यासाठी समर्पित होते. आज भारतीय राजकारणात त्यांचे नाव राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक म्हणून घेतले जाते. जम्मू-काश्मीरच्या विशेष दर्जाशी संबंधित घटनात्मक बदलांनंतर त्यांच्या विचारांचा वारंवार उल्लेख केला जातो. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचा स्मृतिदिन हा केवळ श्रद्धांजली अर्पण करण्याचा दिवस नाही, तर राष्ट्रसेवा, तत्त्वनिष्ठा आणि अखंड भारताच्या संकल्पनेप्रती त्यांची बांधिलकी समजून घेण्याची संधी आहे. शिक्षण, उद्योग, राजकारण आणि राष्ट्रीय एकात्मता या सर्व क्षेत्रांत त्यांनी दिलेले योगदान भारतीय इतिहासात अजरामर राहील. त्यांचे जीवन आजही राष्ट्रप्रेम, धैर्य आणि निःस्वार्थ सार्वजनिक कार्यासाठी प्रेरणादायी आहे.

**राष्ट्रहितासाठी संघर्ष करणाऱ्या या महान नेत्यास स्मृतिदिनानिमित्त**
**दै. ग्लोबल महातेज**
**परिवारातर्फे विनम्र अभिवादन..!**

# सरसकट कर्जमाफीसाठी काँग्रेसचे निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अमळनेर तालुका काँग्रेस कमिटीतर्फे सोमवार, दि. २२ जून रोजी सकाळी ११ वाजता प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांना शेतकरी कर्जमाफीसंदर्भात निवेदन देण्यात आले. यावेळी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बी. के. सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकाऱ्यांनी शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना-२०२६ मधील विविध मुद्द्यांवर आक्षेप नोंदविले. निवेदनात म्हटले आहे, की राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणूक काळात शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्याची घोषणा केली होती. मात्र, २ जून २०२६ रोजी जाहीर करण्यात आलेल्या शासन निर्णयात अनेक जाचक अटी व शर्ती घालण्यात आल्याचा आरोप काँग्रेसतर्फे करण्यात आला.

शासनाच्या निर्णयानुसार शेतकऱ्यांना फक्त दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जाची माफी देण्यात येणार आहे. तसेच २०१९ मधील महात्मा ज्योतिबा फुले कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना केवळ ५० हजार रुपयांपर्यंतच कर्जमाफी दिली जाणार आहे. दोन लाख रुपयांपेक्षा अधिक कर्ज असल्यास उर्वरित रक्कम शेतकऱ्यांनी ३१ मार्च २०२७ पर्यंत बँक खात्यात जमा करण्याची अटही घालण्यात आली आहे. तसेच २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ या तीन वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षांत कर्जाची वेळेत परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना केवळ ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान देण्याची तरतूद आहे. मात्र, यापूर्वी कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना हे अनुदान मिळणार नसल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले. आमदार, खासदार, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, नगरसेवक, केंद्र व राज्य शासन कर्मचारी, आयकर भरणारे व्यक्ती तसेच सहकार क्षेत्रातील पदाधिकारी व कर्मचाऱ्यांना कर्जमाफीपासून वंचित ठेवण्यात आल्याबद्दलही नाराजी व्यक्त करण्यात आली. यावेळी काँग्रेस कमिटीतर्फे शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्यात यावी, २०१९ मधील लाभार्थी शेतकऱ्यांनाही नव्या योजनेत समाविष्ट करावे, अतिरिक्त रक्कम भरण्याची अट रद्द करावी, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी प्रोत्साहनपर अनुदानात वाढ करावी तसेच सहकार क्षेत्रातील कर्मचारी व पदाधिकाऱ्यांनाही लाभ द्यावा, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या. तसेच शेतीमालाला हमीभाव मिळेपर्यंत हमीभाव व बाजारभावातील तफावत शेतकऱ्यांना देण्याची मागणीही करण्यात आली. निवेदन देताना तालुका अध्यक्ष भागवत सूर्यवंशी, जिल्हा सरचिटणीस मनोज पाटील, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा सौ. सुलोचनाताई वाघ, जिल्हा सरचिटणीस संदीप घोरपडे, जिल्हा एनएसयूआय अध्यक्ष ॲड. कौस्तुभ पाटील, ॲड. रज्जाक शेख, सेवादल तालुका अध्यक्ष बन्सीलाल भागवत, एससी-एसटी तालुकाध्यक्ष भगवान संदानशीव, विधानसभा क्षेत्र अध्यक्ष हर्षल जाधव, तालुका उपाध्यक्ष पी. वाय. पाटील, रामकृष्ण पाटील, डॉ. रवींद्र पाटील, दिलीप पाटील, सुधाकर भैसे, मगन पाटील, कैलास पाटील, राजू भाट, डॉ. प्रकाश पाटील, शालिग्राम पाटील, पीतांबर पाटील, सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष तुषार संदानशीव, संदीप बारी, उमेश संदानशीव आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.



*अमळनेर : शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी मिळावी, या मागणीसाठी सोमवार, दि. २२ जून रोजी काँग्रेसतर्फे प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांना निवेदन देताना तालुकाध्यक्ष भागवत सूर्यवंशी, मनोज पाटील, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा सौ. सुलोचनाताई वाघ, संदीप घोरपडे, ॲड. कौस्तुभ पाटील, ॲड. रज्जाक शेख, बन्सीलाल भागवत, भगवान संदानशीव, हर्षल जाधव, पी. वाय. पाटील, रामकृष्ण पाटील, डॉ. रवींद्र पाटील, दिलीप पाटील, सुधाकर भैसे, मगन पाटील, कैलास पाटील, राजू भाट, डॉ. प्रकाश पाटील, शालिग्राम पाटील, पीतांबर पाटील, तुषार संदानशिव, संदीप बारी, उमेश संदानशिव आदी.*

# गायत्री मंदिर परिसरातील बांबूच्या झाडांना आग

## अग्निशमन दलाच्या तत्परतेने मोठा अनर्थ टळला

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील गायत्री मंदिर परिसरात बांबूच्या झाडांना आग लागल्याची घटना घडली. आग लागलेल्या ठिकाणाच्या अगदी जवळ पेट्रोलपंप असल्याने परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, पालिकेच्या अग्निशमन दलाच्या तत्पर कार्यवाहीमुळे आग वेळीच आटोक्यात आली आणि संभाव्य मोठा अनर्थ टळला.

विशेष म्हणजे घटनास्थळाच्या जवळच पेट्रोलपंप असल्यामुळे आग आणखी भडकली असती, तर मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. घटनेची माहिती मिळताच नगरसेवक प्रताप साळी यांनी तातडीने नगरपरिषदेचे अग्निशमन अधिकारी गणेश गोसावी यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधून परिस्थितीची माहिती दिली. त्यानंतर अग्निशमन दलाचे कर्मचारी फारूक शेख, वासीम पठाण आणि मच्छिंद्र चौधरी यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन दलाने कोणताही विलंब न करता आग विझविण्याचे काम सुरू केले. कर्मचाऱ्यांच्या शर्थीच्या प्रयत्नांमुळे काही वेळातच आग पूर्णपणे आटोक्यात आणण्यात यश आले. त्यामुळे आग पेट्रोलपंप किंवा इतर ठिकाणी पसरण्यापूर्वीच नियंत्रणात आली. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसून मोठी वित्तहानीही टळली आहे. अग्निशमन दलाच्या वेळेवर आणि प्रभावी कारवाईमुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, संबंधित कर्मचाऱ्यांचे कौतुक होत आहे. शहरात वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर अशा घटनांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले आहे.



# विवाहित असूनही लग्नासाठी दबाव

## बदनामीची धमकी देत फोटो प्रसारित केल्याप्रकरणी तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : स्वतः विवाहित असूनही एका तरुणीवर लग्नासाठी दबाव टाकणे, नकार दिल्यानंतर बदनामी करण्याची धमकी देणे तसेच बदनामीकारक फोटो नातेवाईकांना पाठविले. या प्रकरणी रायगड जिल्ह्यातील वाकडी येथील अभिषेक तानाजी हटकर याच्याविरुद्ध अमळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अमळनेर येथील तरुणीने दिलेल्या फिर्यादीनुसार अभिषेक तानाजी हटकर हा २०१९ मध्ये तिला पाहण्यासाठी आला होता. मात्र, त्यावेळी संबंधित तरुणीचे लग्न दुसऱ्या तरुणाशी झाले. त्यानंतर तिची पहिल्या पतीशी फारकत झाली. दरम्यान, २०२३ मध्ये अभिषेक हटकर याने इन्स्टाग्रामद्वारे तरुणीशी संपर्क साधून तिच्याशी लग्न करण्याचा आग्रह धरला. मात्र, तरुणीने त्यास नकार दिला. यानंतर तरुणीला अभिषेकने हा आधीच विवाहित असून त्याला अपत्य असल्याची माहिती मिळाली. त्यावर त्याने पत्नीपासून फारकत घेणार असल्याचे सांगत पुन्हा लग्नासाठी दबाव टाकला. तरुणीने पुन्हा नकार दिल्यानंतर त्याने तिचे बदनामीकारक फोटो आणि व्हिडिओ प्रसारित करण्याची, समाजात बदनामी करण्याची तसेच तिचे लग्न होऊ न देण्याची धमकी दिली. लग्न झाल्यास सासरी जाऊन बदनामी करेल, असेही त्याने सांगितल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. तरुणीने त्याला स्पष्ट नकार देत अशा धमक्यांना घाबरत नसल्याचे सांगितले. त्यानंतर अभिषेकने तरुणीच्या मेहुण्याच्या मोबाईलवर बदनामीकारक फोटो पाठविल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. दि. १३ सप्टेंबर २०२५ रोजी याबाबत अमळनेर पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज देण्यात आला होता. मात्र, त्यानंतरही तो न थांबता तरुणीच्या नातेवाईकांमध्ये तसेच कार्यालयातील सहकाऱ्यांकडे तिची बदनामी करत राहिल्याचा आरोप आहे.

यासंदर्भात तरुणीच्या वडिलांनी १८ मे २०२६ रोजी अभिषेकविरुद्ध अदखलपात्र गुन्ह्याची नोंद केली होती. तसेच मुलीच्या कुटुंबीयांनी अभिषेकच्या कुटुंबीयांनाही याबाबत माहिती दिली होती. मात्र, त्यानंतरही संबंधित तरुणाकडून बदनामीचे प्रकार सुरूच राहिल्याने अखेर तरुणीने अमळनेर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून अभिषेकविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार विनोद सोनवणे तपास करीत आहेत.

## दारूच्या नशेत विषप्राशन; फापोरेच्या तरुणाचा मृत्यू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : दारूच्या नशेत विषप्राशन केल्यानंतर उपचार सुरू असताना तालुक्यातील फापोरे खुर्द येथील पंकज मोतीलाल पाटील याचा मृत्यू झाला. याबाबत पोलिसांनी सांगितले, की दि. २२ मे रोजी सकाळी आठच्या सुमारास फापोरे येथे पंकज पाटील याने विषप्राशन केल्याची माहिती कैलास पाटील यांना त्यांच्या भावाच्या पत्नीने दूरध्वनीद्वारे दिली. यावेळी पंकज यांनी स्वतः दारूच्या नशेत विष घेतल्याचे तसेच प्रकृती बिघडत असल्याचे सांगितले. त्यानंतर त्यास तातडीने ग्रामीण रुग्णालयात दाखल करून प्राथमिक उपचार करण्यात आले. त्यानंतर त्यास पुढील उपचारासाठी धुळे येथील शासकीय हिरे वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, ३० मे रोजी उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाल्याचे डॉ. यश इतेकर यांनी घोषित केले. याबाबत अमळनेर पोलीस ठाण्यात मावसभावाच्या फिर्यादीवरून आकस्मिक मृत्यूची नोंद झाली आहे. हवालदार कैलास शिंदे तपास करीत आहेत.

## अमळनेर कृषी उत्पन्न बाजार समिती
## दैनिक बाजारभाव

| प्रकार | भाव | |
|---|---|---|
| | कमी | जास्त |
| गहू | २२०० | २३८८ |
| बाजरी | २२७१ | २३३३ |
| दादर | २९०० | ३६०० |
| हा.ज्वारी | २२५० | २३४६ |
| मका लाल | २००० | २१६६ |
| मुंग | ६८०० | ७५८० |
| उडीद | -- | -- |
| हरभरा काबुली व्ही.टू. | ५८०० | ६१०० |
| हरभरा गावराणी | ५००० | ५२०० |
| हरभरा गुलाबी | ५२८० | ५४०० |
| हरभरा चापा | ५४०० | ५६०० |
| हरभरा डॉलर सफेद | ६९०० | ७००० |
| हरभरा गुल्लर | -- | -- |
| चवळी | -- | -- |
| तूर | ६५०० | ६८५० |
| शेंगा | -- | ८५०० |
| तीळ | ८८०० | ९२०० |
| सोयाबीन | -- | -- |
| सूर्यफुल | -- | -- |
| धणे | --- | -- |
| जिरे | -- | -- |
| पांढरी तूर | -- | -- |

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# जांभूळ मध ठरतो रक्तातील साखरेसाठी उपयुक्त; एनसीएल संशोधनातून नवे वैज्ञानिक पुरावे

## अँटीऑक्सिडंट्सने समृद्ध जांभूळ मधात ग्लुकोज कमी; भेसळ ओळखण्यासाठी ‘केमिकल प्रोफाइलिंग’ पद्धतीचा विकास

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जांभूळ मधामध्ये रक्तातील साखरेवर तुलनेने कमी परिणाम करणारे गुणधर्म असल्याचे आणि त्याचबरोबर शरीराला संरक्षण देणाऱ्या अँटीऑक्सिडंट्सचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असल्याचे पुण्यातील राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेतील शास्त्रज्ञांच्या संशोधनातून स्पष्ट झाले आहे. अत्याधुनिक वैज्ञानिक तंत्रज्ञानाच्या आधारे करण्यात आलेल्या या अभ्यासामुळे जांभूळ मधाला नवी ओळख मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

एनसीएलचे संचालक डॉ. आशिष लेले, शास्त्रज्ञ डॉ. उदय किरण मारेल्ली यांनी या संशोधनाची माहिती पत्रकार परिषदेत दिली. महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळाचे अध्यक्ष रवींद्र साठे या वेळी उपस्थित होते. डॉ. उदय किरण मारेल्ली यांच्या नेतृत्वाखालील संशोधन गटामध्ये स्नेहल वाघोले, शिरीन मॉन्सी, सपना रवींद्रनाथन यांचा समावेश होता. आशिष लेले म्हणाले, महाबळेश्वरच्या डोंगराळ परिसरातून जमा केलेल्या ८२ अस्सल जांभूळ मधाच्या नमुन्यांचा सखोल अभ्यास करण्यात आला. या नमुन्यांचे विश्लेषण शास्त्रज्ञांनी न्यूक्लियर मॅग्नेटिक रेझोनन्स आणि मास स्पेक्ट्रोमेट्री यांसारख्या जगातील अत्यंत प्रगत वैज्ञानिक विश्लेषण तंत्रज्ञानाचा माध्यमातून केले.



### भेसळयुक्त मधाला बसणार चाप

मधामध्ये होणारी भेसळ ही जगभरात चिंतेची बाब बनली आहे. मधातील फुलांचा अचूक स्रोत शोधण्यासाठी पारंपरिक परागकण विश्लेषण पद्धती अनेकदा अपुरी ठरते. यावर प्रभावी उपाय म्हणून ‘एनसीएल’च्या शास्त्रज्ञांनी जांभूळ मधाची ओळख पटवण्यासाठी एक आधुनिक ‘केमिकल प्रोफाइलिंग’ पद्धत विकसित केली आहे. जांभूळ मध आणि भेसळयुक्त मध यांमधील फरक अगदी अचूकतेने ओळखता येतो. या संशोधनामुळे भारतातील स्थानिक मधाच्या विविध जातींचे बाजार मूल्य वाढेल आणि ग्राहकांचा विश्वास अधिक दृढ होईल, असा विश्वास संचालक डॉ. लेले यांनी व्यक्त केला.

### रक्तातील साखर कमी करण्यासाठी प्रभावकारी

या संशोधनात जांभूळ मधामध्ये ग्लुकोजचे प्रमाण इतर मधांच्या तुलनेत खूप कमी, तर फ्रुक्टोजचे प्रमाण अधिक असते. यामुळे या मधाचे सेवन केल्यावर रक्तामध्ये साखर अतिशय संथगतीने मिसळली जाते. पारंपरिक काळापासून जांभूळ मध मधुमेहासाठी गुणकारी मानले जात असून, या संशोधनामुळे याला भक्कम आधार मिळाला आहे.

### स्वदेशी मधांच्या जातींना मिळणार नवी ओळख

भारतातील विविध प्रदेशांमध्ये उत्पादित होणाऱ्या मधाची खरी ओळख, त्याचे भौगोलिक मूळ आणि अस्सलता शास्त्रीय पद्धतीने निश्चित करण्यासाठी पुण्यातील राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेने (एनसीएल) महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेतला आहे. देशातील विविध फुलोऱ्यांपासून तयार होणाऱ्या स्वदेशी मधांचा राष्ट्रीय स्तरावरील माहितीचे संकलन करून डेटाबेस तयार करण्याचे काम सुरू आहे. त्यासाठी आवश्यक प्रारूप आणि संशोधन प्रक्रिया विकसित केली आहे. यामुळे भारतीय मधाला जागतिक बाजारपेठेत स्वतंत्र ओळख मिळण्यास मदत होणार आहे. एनसीएलचे संचालक डॉ. आशिष लेले आणि शास्त्रज्ञ डॉ. उदय किरण मारेल्ली यांनी याबाबत माहिती दिली. देशातील विविध राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर मध उत्पादन होत असले तरी त्याची अस्सलता तपासण्यासाठी सध्या स्वतंत्र भारतीय मानके उपलब्ध नाहीत. त्यामुळे विविध प्रकारच्या मधांमधील रासायनिक वैशिष्ट्ये, गुणधर्म आणि संरचनेचा अभ्यास करून त्यासाठी वैज्ञानिक निकष विकसित करण्याचे काम सुरू आहे. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात जांभूळ, कारवी, मोहरी यांसह विविध प्रकारच्या मधांचे विश्लेषण करण्यात आले आहे.

### विविध जातींच्या मधाच्या माहितीचे होणार संकलन

मधाची चाचणी करण्याची यंत्रणा यापूर्वी देशात नव्हती. स्वदेशी मधाचे नमुने परदेशात पाठवून त्याच्या चाचण्या केल्या जात होत्या. त्यामुळे आपल्या मधाची माहिती परदेशी जात होती. मात्र, आता देशातच मधाच्या चाचण्या करता येतील. प्रत्येक औषधाची ‘एनएमआर चाचणी’ केली जाते. त्याप्रमाणे मधाचीही करता येईल. याबाबत एनसीएलमध्ये यंत्रणा विकसित करण्यात आल्याचे डॉ. उदय मारेल्ली यांनी सांगितले.

**जांभूळ मधाची वैशिष्ट्ये**

शरीराला फायदेशीर ठरणारे माग्रिसेटीन, केम्पफेरॉल असे एकूण १२ प्रकारचे नैसर्गिक घटक जांभूळ मधात मुबलक हे घटक शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास फायदेशीर मधाचे खराब होण्याचे प्रमाण कमी; दीर्घकाळ टिकते. मधामध्ये ग्लुकोजचे प्रमाण खूपच कमी (१०० ग्रॅम मधात २५.९१ ग्रॅम) आढळले. ग्लुकोज आणि फ्रुक्टोजचे एकूण एकत्रित प्रमाणही इतर मधांपेक्षा कमी. या मधाचा ‘ग्लायसेमिक इंडेक्स’ (रक्तातील साखर वाढवण्याचा वेग) अत्यंत कमी.

# मांजर आणि उंदराची दुश्मनी का असते?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

निसर्गातील काही जोड्या जन्मापासूनच कट्टर वैरी असतात. त्यापैकीच एक म्हणजे मांजर आणि उंदीर

यांच्या वादामागे केवळ अन्न नसून काही धक्कादायक कारणे आहेत. चला या जन्मजात दुश्मनीमागील रहस्ये उलगडूया.

मांजरींमध्ये जन्मापासूनच तीव्र शिकार करण्याची प्रवृत्ती असते.

उंदराचे वेगाने पळणे मांजरीला हल्ला करण्यास प्रवृत्त करते.



निसर्गाच्या अन्न साखळीनुसार उंदीर हे मांजरीचे हक्काचे भक्ष्य आहे.

पोट भरलेले असतानाही मांजर मनोरंजनासाठी उंदराचा पाठलाग करते.

उंदराचा विशिष्ट वास मांजरीला त्याच्याकडे त्वरित आकर्षित करतो.

‘टॉक्सोप्लाझ्मा गोंडी’ परजीवीमुळे उंदराच्या मनातील मांजरीची भीती संपते.

जागा न उरल्यास उंदीर स्वतःचा जीव वाचवण्यासाठी प्रतिहल्ला करतो.

माणसाने उंदीर कमी करण्यासाठीच पूर्वी मांजरी पाळणे सुरू केले.

# आईला वर्दीत पाहून मिळाली प्रेरणा

## एकदा नव्हे तर दोनदा यूपीएससी क्रॅक; आधी आयपीएस मग आयएएस झालेल्या पूजा गुप्ता आहेत तरी कोण?

**सक्सेस स्टोरी**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मेहनत, जिद्द आणि इच्छाशक्ती या तीन गोष्टी जर तुमच्याकडे असतील तर तुम्ही काहीही करु शकतात. यश हे तुम्हाला मिळणारच. असेच काहीसे दिल्लीच्या पूजा गुप्ता यांच्यासोबत झाले. त्यांनी आपल्या मेहनतीच्या जोरावर यूपीएससी परीक्षा पास केली. एकदा नव्हे तर दोनदा यूपीएससी परीक्षा पास केली. २०१८ मध्ये पूजा यांनी यूपीएससी परीक्षा पास केली. त्या आयपीएस अधिकारी झाल्या. मात्र, त्यांच्या आजोबांचे पूजा या आयएएस ऑफिसर व्हाव्यात, असे स्वप्न होते. त्यासाठी त्यांनी खूप मेहनत घेतली आणि आयपीएसनंतर त्या आयएएस झाल्या.



पूजा यांनी दुसऱ्यांदा नोकरीसोबतच यूपीएससी परीक्षेचा अभ्यास केला. २०१८ नंतर लगेच २०२० मध्ये त्यांनी यूपीएससी परीक्षेत ४२ रँक प्राप्त केली. त्या आज आयएएस अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

### मेडिकलची तयारी

पूजा या मूळच्या दिल्लीच्या आहेत. त्यांचे वडील प्रायव्हेट कंपनीत काम करत होते. त्यांची आई इन्स्पेक्टर आहेत. त्यांनी १२ वीनंतर मेडिकलची तयारी करण्याचा निर्णय घेतला. दरम्यान, अभ्यास करताना त्यांच्या मनात नेहमी देशसेवा करण्याचा विचार यायचा. आईला वर्दीत पाहून त्यांनाही सिव्हिल सर्व्हिसमध्ये जाण्याची प्रेरणा मिळाली.

पूजा यांनी यूपीएससी परीक्षेची तयारी सुरू केली. मेहनत आणि वेळेचं गणित साधत त्यांनी स्ट्रॅटेजी तयार केली. या माध्यमातून त्यांनी देशातील सर्वात अवघड परीक्षा यूपीएससी परीक्षा पास केली. त्यांनी २०१८ मध्ये यूपीएससी परीक्षा पास केली. त्यांनी २०२० मध्ये पुन्हा एकदा यूपीएससी परीक्षा पास केली.

# कड़ाही के हैंडल पर जमी जिद्दी चिकनाई और कालिख को कैसे साफ करें

## अपनाएं ३ आसान घरेलू उपाय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कड़ाही के हैंडल पर जमी कालिख और चिकनाई कई बार साधारण डिशवॉश लिक्विड से साफ नहीं होती। ऐसे में ३ असरदार घरेलू नुस्खे हैं, जो जिद्दी दागों को खत्म करने में मदद कर सकते हैं।

कई बार कड़ाही को अच्छी तरह धोने के बाद भी उसके हैंडल पर जमी चिकनाई और कालिख पूरी तरह साफ नहीं होती। खासकर गैस चूल्हे पर रोज इस्तेमाल होने वाली लोहे, स्टील या एल्युमिनियम की कड़ाही के हैंडल जल्दी काले और चिपचिपे हो जाते हैं। दरअसल, खाना बनाते समय तेल की भाप, मसालों का धुआं और गैस की आंच मिलकर हैंडल पर एक मोटी परत बना देते हैं। समय के साथ यह परत इतनी सख्त हो जाती है कि सामान्य डिशवॉश लिक्विड और पानी से भी आसानी से साफ नहीं होती।

इसके अलावा कई लोग कड़ाही के अंदर वाले हिस्से को तो अच्छी तरह साफ कर देते हैं, लेकिन हैंडल के कोनों, स्क्रू और जोड़ वाली जगहों पर ध्यान नहीं देते। यह जगह सबसे ज्यादा गंदगी जमा करती है। जब चिकनाई पर बार-बार गर्मी पड़ती रहती है, तो वह धीरे-धीरे कालिख जैसी काली परत में बदल जाती है। ऐसे में धीरे-धीरे इसकी चमक खत्म होने लगती है और कड़ाही पुरानी व गंदी दिखने लगती है। इसलिए केवल कड़ाही का अंदरूनी हिस्सा ही नहीं, बल्कि हैंडल की सफाई पर भी ध्यान देना उतना ही जरूरी है। कुछ आसान घरेलू तरीके हैं, जिनकी मदद से हैंडल की काली परत को साफ किया जा सकता है।



### १) बेकिंग सोडा और नींबू

बेकिंग सोडा और नींबू की मदद से कड़ाही के हैंडल पर जमी चिकनाई और कालिख को हटाने में इस्तेमाल किया जा सकता है। इसके लिए सबसे पहले एक कटोरी में २ चम्मच बेकिंग सोडा लें और उसमें थोड़ा नींबू का रस मिलाकर गाढ़ा पेस्ट बना लें। अब इस पेस्ट को हैंडल और काली पड़ी जगहों पर अच्छी तरह लगाकर १०-१५ मिनट के लिए छोड़ दें। इससे जमी हुई गंदगी ढीली होने लगती है। इसके बाद पुराने टूथब्रश या स्क्रबर की मदद से रगड़कर साफ कर दें। नींबू की एसिडिक प्रकृति चिकनाई को हटाने और बेकिंग सोडा जिद्दी कालिख को हटाने में मदद कर सकता है।

### २) सिरका और गर्म पानी

अगर हैंडल बहुत ज्यादा चिपचिपा हो गया है, तो ऐसे में सफेद सिरका और गर्म पानी काफी असरदार साबित हो सकते हैं। इसके लिए एक बर्तन में गर्म पानी लें और उसमें थोड़ा सफेद सिरका मिलाएं। अब कपड़े या स्पंज को इस मिश्रण में डुबोकर हैंडल पर अच्छी तरह रगड़ें। जहां ज्यादा कालिख जमी हो वहां कुछ देर के लिए सिरके वाला कपड़ा लपेटकर छोड़ सकते हैं। सिरका तेल और धुएं से बनी मोटी परत को नरम करता है, जिससे गंदगी आसानी से निकल जाती है। इसके बाद पुराने टूथब्रश या स्क्रबर की मदद से रगड़कर साफ कर लें, फिर साफ पानी से धो लें।

### ३) ज्यादा गंदी है तो आजमाएं ये नुस्खा

अगर कड़ाही के हैंडल ज्यादा काले हो गए हैं, तो बेकिंग सोडा और सिरका काफी असरदार साबित हो सकते हैं। यह बहुत ज्यादा जमी गंदगी और पुरानी चिकनाई के लिए काफी असरदार माने जाते हैं। इसके लिए सबसे पहले हैंडल पर बेकिंग सोडा छिड़कें, फिर उसके ऊपर थोड़ा सिरका डालें। इससे हल्का झाग बनने लगेगा। ५-१० मिनट के लिए उसे छोड़ दें। इसके बाद स्क्रबर या ब्रश से रगड़कर साफ कर दें। यह तरीका लंबे समय से जमी कालिख और तेल की मोटी परत को हटाने में मदद कर सकता है।

### स्टील के काले और गंदे मेन गेट को साफ करने का तरीका, इन ५ घरेलू चीजों से चमकाएं

स्टील या लोहे के गेट बारिश, धूप और प्रदूषण के कारण जल्दी गंदे हो जाते हैं। अगर समय पर इसकी सफाई न की जाए तो इन पर जंग लगने लगता है और धीरे-धीरे चमक खत्म होने लगती है। हालांकि, कुछ आसान घरेलू तरीकों की मदद से आप स्टील के गेट को फिर से नया जैसा बना सकते हैं।


शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे






# मांगलिक मुलीचे लग्न फक्त मांगलिक मुलाशीच करावे का?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सर्वसाधारणपणे असे मानले जाते, की मांगलिक मुलीचे लग्न मांगलिक मुलाशी करावे अन्यथा वैवाहिक जीवनात अडथळे निर्माण होतात. ते खरे आहे का? मांगलिक मुला-मुलींनींच आपसांत लग्न करावे का?

ज्योतिषशास्त्रानुसार जन्मकुंडलीत मंगळ तीन प्रकारचा मानला जातो. १) सौम्य मंगळ, २) मध्यम मंगळ आणि ३) कडक मंगळ. असे म्हणतात की सौम्य मंगळाचा दोष कायमस्वरूपी नसतो, तर तो वयाच्या २८ व्या वर्षी संपतो. मात्र, कडक मंगळ दोष दूर करण्यासाठी श्री मंगळग्रह देवांची हवन रूपाने शांती करण्याची गरज असते आणि केवळ या लोकांना लग्नाच्या संबंधात कुंडली जुळण्याची गरज सांगितली जाते.





ज्योतिषशास्त्रानुसार जर मुलगा मांगलिक असेल आणि मुलीला मंगळ दोष नसेल तर लग्न होऊ शकते. मात्र, त्यासाठी मुलीच्या कुंडलीत दुसऱ्या, सातव्या, आठव्या आणि बाराव्या घरात राहू, केतू आणि शनी यांचे स्थान असले पाहिजे.

जर मुलगा किंवा मुलगी यापैकी एकाला मध्यम मंगळ असेल आणि दोघांचे वय २८ वर्षपिक्षा जास्त असेल तर त्यांचे लग्न होऊ शकते. कारण २८ वर्षांनंतर मांगलिक दोष संपतो. अशा स्थितीत विवाहापूर्वी पंडिताच्या सल्ल्याने मांगलिक दोषाची हवन रूपाने शांती केली पाहिजे.

जर एखाद्या व्यक्तीच्या कुंडलीत मंगल दोष असेल आणि कुंडलीत शनी, गुरू, राहू किंवा केतू समोर बसले असतील तर मांगलिक दोष आपोआप संपतो आणि मंगळ दोष नसणाऱ्यांशी लग्न होऊ शकते.

मांगलिक जन्मकुंडलीत मंगळासोबत शुभ ग्रहांची दृष्टी असेल किंवा शुभ ग्रह केंद्रात असतील तर मांगलिक दोष लागत नाही. यासोबतच जर मुलाच्या किंवा मुलीच्या कुंडलीत मंगळ ज्या स्थानात असेल त्याच ठिकाणी शनी, राहू किंवा केतू असेल तर मंगळाचा दोष संपतो.

घट विवाह, अश्वथ विवाह, भट पूजा किंवा श्री मंगळग्रह देवांचा अभिषेक केला असता मांगलिक गैर-मांगलिकाशी विवाह करू शकतात.

महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यातील अमळनेर येथे विश्वातील एकमात्र श्री मंगळग्रह देवांची स्वयंभू मूर्ती असलेले प्राचीन मंदिर आहे. या मंदिरात दर मंगळवारी पंचामृत अभिषेक, मंगळवारशिवाय इतर दिवशी नित्यप्रभात श्री मंगल अभिषेक, स्वतंत्र अभिषेक पूजा, सामूहिक मंगळ अभिषेक आणि हवनात्मक अभिषेक केला जातो. जर तुमच्या जन्मकुंडलीत मंगळ दोष सौम्य स्वरूपात असेल तर तुम्ही सामूहिक मंगळ अभिषेक करू शकता आणि जर तुमचा मंगळ मध्यम असेल तर तुम्ही स्वतंत्र अभिषेक पूजा अन्यथा श्री मंगळग्रह देवांचा जपही करू शकता. परंतु जर तुमचा मंगळ दोष कडक स्वरूपात असेल तर तुम्हाला हवनात्मक शांती-अभिषेक करण्याचा सल्ला पंडितांकडून दिला जातो. या अभिषेक पूजा, जप तसेच हवनात्मक शांती अमळनेर येथील श्री मंगळग्रह देवांच्या मंदिरात दररोज केली जाते.

# मंगळवारी ही ४ कामे केल्यास उद्भवतील समस्या, हनुमानजी होतील नाराज!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मंगळवार हा भगवान हनुमानजींच्या भक्तीचा दिवस आहे. शास्त्रानुसार या दिवशी विधीनुसार हनुमानजींची पूजा केल्याने हळूहळू सर्व प्रकारच्या संकटांपासून मुक्ती मिळते. हनुमानजींना प्रसन्न करण्यासाठी लोक अनेक उपाय करतात. पण कधी-कधी काही तरी चूक घडते, की ज्यामुळे हनुमानजी रागावतात. चला जाणून घेऊया अशी कोणती कामे आहेत जी केल्याने हनुमानजी कोपतात.

**मंगळवारी चुकूनही**
**ही कामे करू नका**

१) मंगळवारी मीठ खाणे टाळावे. या दिवशी मीठ सेवन केल्याने तुम्हाला अनेक समस्यांना सामोरे जावे लागू शकते. त्याचा नकारात्मक परिणाम तुमच्या आरोग्यावरही दिसून येतो.



२) हनुमानजींचा आशीर्वाद घेण्यासाठी मंगळवारी मांस, मद्य, अंडी, मासे यांचे सेवन करू नये. असे केल्याने हनुमानचीं रागवतात आणि जीवनात अनेक समस्या निर्माण होतात.

३) ज्योतिषशास्त्रानुसार मंगळवारी पश्चिम आणि उत्तरेकडे प्रवास करणे वर्ज्य आहे. जर काही कारणास्तव तुम्हाला या दिशेने प्रवास करणे आवश्यक असेल तर घरातून बाहेर पडताना गूळ अवश्य खा. असे केल्याने वाईट परिणाम कमी होतात.

४) मंगळवारी कोणत्याही व्यक्तीला उधार देऊ नये. या दिवशी दिलेले पैसे परत मिळण्याची शक्यता कमी आहे.

# 'हा' मंत्र सिद्ध केल्यास हनुमानजींची दर्शनरूपी होते कृपा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हनुमानजींच्या जन्मदिनी त्यांची योग्य पूजा करून आणि त्यांच्या मंत्रांचा जप केल्यास त्यांच्याकडून आशीर्वाद मिळतो आणि सर्व प्रकारचे त्रास दूर होतात. परंतु असे म्हटले जाते, की हनुमानजींना हाक मारण्याचा एक मंत्र आहे जो आदिवासी समाजात लोकप्रिय आहे. मान्यतेनुसार जेव्हा हा मंत्र सिद्ध होतो तेव्हा हनुमानजी दर्शन देण्यासाठी प्रत्यक्ष प्रकट होतात.

भगवान हनुमानजींना अमरत्वाचे वरदान मिळाले आहे. ते अजूनही जीवंत असून हिमालयातील जंगलात राहतात, असे मानले जाते. ते भक्तांना मदत करण्यासाठी मानवी समाजात येतात. परंतु ते त्यांच्यासाठी अदृश्य राहतात. तथापि, एक गुप्त मंत्र आहे ज्याचा जप केल्याने हनुमानजी भक्तासमोर प्रकट होतात.

**मंत्र**

**कालतंतु कारेचरन्ति एनर मरिष्णु।**
**निर्मुक्तेर कालेत्वम अमरिष्णु॥**

**मंत्राचा अर्थ**



काळ पुढे सरकत राहतो आणि तो सर्वांना सोबत घेऊन जातो. आपण सर्वजण जन्माला येतो आणि एके दिवशी आपल्याला मृत्यूला सामोरे जावे लागते. पण जेव्हा आपल्याला मोक्ष मिळतो तेव्हा आपल्याला मृत्यूची भीती वाटत नाही कारण मोक्ष मिळाल्याने आपण अमर होतो. मुक्तीच्या वेळी आपण मृत्यूपासून मुक्त होतो आणि अमर होतो.

हनुमानजी हे कलियुगातील सहज प्रसन्न होणारे देव आहेत. केवळ स्मरण केल्याने ते आशीर्वाद देतात. प्रथम वरील मंत्रांना सिद्ध करावे लागेल. मंगळवारी, जयंतीच्या दिवशी, कोणत्याही हनुमान मंदिरात पूजा करा आणि नैवेद्य दाखवा. घरी हनुमानजींचे चित्र लाल कापडावर ठेवून त्यांची पूजा करा. पूजेदरम्यान चंदन, सिंदूर, अक्षता, कणेर, जास्वंद किंवा गुलाबाच्या फुलांचा वापर करा. नैवद्यात मालपुआ, बेसनाचे लाडू, गोड बुंदी किंवा इमरती इत्यादी घ्या, नंतर आरती करा, संकल्प करा आणि तुमच्या समस्येनुसार मंत्राचा जप करा.

पूर्वेकडे तोंड करून जप करा. रुद्राक्षाची माळ घाला, ब्रह्मचर्य पाळा आणि लाल वस्त्र घाला. तुमच्या क्षमतेनुसार जप करा आणि उपलब्ध साधनांचा वापर करून एक माळ हवन करा, मंत्राची सिद्धी होईल. यानंतर काम पूर्ण होईपर्यंत दररोज एक जपमाळ करा, मध्येच थांबू नका.

**मंत्र जप करण्याच्या अटी**

१) हनुमानजींचे भक्त असणे आधीच आवश्यक आहे. भक्ताला त्याच्या आत्म्याचे हनुमानाशी असलेले नाते माहिती असले पाहिजे.

२) ज्या ठिकाणी हा मंत्र जपला जातो त्या ठिकाणापासून ९८० मीटरच्या आत असा कोणताही व्यक्ती नसावा जो अट क्रमांक एक पूर्ण करत नाही. याचा अर्थ असा की एकतर ९८० मीटरच्या परिसरात दुसरा कोणताही मानव नसावा किंवा जर या परिसरात कोणी मानव असेल तर त्यांनी अट क्रमांक एक पूर्ण केली पाहिजे, म्हणजेच त्यांना त्यांच्या आत्म्याचा हनुमानजींशी असलेल्या संबंधाची जाणीव असली पाहिजे.

**मंत्र मिळविण्याची कहाणी**

हा गुप्त मंत्र स्वतः भगवान हनुमानजींनी पिदुरु पर्वताच्या जंगलात राहणाऱ्या काही आदिवासींना दिला होता. पिदुरु (पूर्ण नाव 'पिदुरुथलागला') हा श्रीलंकेतील सर्वांत उंच पर्वत आहे. भगवान प्रभू श्रीरामचंद्रांनी आपले मानव जीवन संपवल्यानंतर, भगवान हनुमानजी अयोध्येहून परतले आणि जंगलात राहू लागले. रावणाचा भाऊ विभीषण जेथे राज्य करत होता त्या लंकेतील जंगलांनाही त्याने भेट दिली. त्याने भगवान प्रभू श्रीरामचंद्रांचे स्मरण करत लंकेच्या जंगलात बरेच दिवस घालवले. त्यावेळी काही वनवासींनी त्यांची सेवा केली. तेथून परतताना त्यांनी त्या वनवासींना हा मंत्र दिला आणि म्हणाले, "तुमच्या माझ्यावरील सेवेने आणि भक्तीने मी प्रसन्न झालो आहे. जेव्हा जेव्हा तुम्हाला मला भेटायचे असेल तेव्हा फक्त हा मंत्र म्हणा. मी प्रकाशाच्या वेगाने तुम्हाला भेटायला येईन." त्या आदिवासींचा प्रमुख म्हणाला, "प्रभू, आपण हा मंत्र गुप्त ठेवू, पण जर दुसऱ्या कोणाला हा मंत्र मिळाला आणि तो त्याचा गैरवापर करू लागला तर?" भगवान हनुमानजींनी उत्तर दिले, "काळजी करू नका. जर हा मंत्र जप करणाऱ्या व्यक्तीला त्याच्या आत्म्याचा माझ्याशी असलेल्या संबंधाची जाणीव नसेल तर तो काम करणार नाही."

# हनुमान चालिसामध्ये दडले आहे रोग-दोष निवारणाचे रहस्य!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मातील प्रत्येक दिवस कोणत्या ना कोणत्या देवतांना समर्पित आहे, त्याचप्रमाणे मंगळवार हा हनुमानजींना समर्पित आहे. असे मानले जाते की मंगळवारी संकटमोचन पूजन केल्याने तुमचे सर्व संकट दूर होतात. यासोबतच जर तुम्ही रोग-ग्रह-दोषांमुळे त्रस्त असाल किंवा यश सतत घसरत असेल, तुमच्या प्रगतीत काही अडथळे येत असतील, तर तुम्ही मंगळवारी हनुमान चालिसाचे पठण अवश्य करा, त्याचा तुम्हाला नक्कीच फायदा होईल. तुम्हाला यश मिळेल. नशीब चमकेल. दररोज हनुमान चालिसाचे पठण केल्याने आपल्या जीवनातील सर्व दुःख आणि दुःख दूर होतात. प्रत्येक संकटातून आपण बाहेर पडतो. आपल्या शरीराला निरोगी ठेवण्याचे रहस्य देखील हनुमान चालिसामध्ये दडलेले आहे. चला तर मग जाणून घेऊया हनुमान चालिसाच्या पाठाबद्दल.

**दोहा :**

श्रीगुरु चरन सरोज रज,
निज मनु मुकुरु सुधारि।
बरनऊँ रघुबर बिमल जसु,
जो दायकु फल चारि॥
बुद्धिहीन तनु जानिके,
सुमिरौं पवन-कुमार।
बल बुद्धि बिद्या देहु मोहिं,
हरहु कलेस बिकार॥

**चौपाई :**

जय हनुमान ज्ञान गुन सागर।
जय कपीस तिहुँ लोक उजागर॥
रामदूत अतुलित बल धामा।
अंजनि-पुत्र पवनसुत नामा॥
महाबीर बिक्रम बजरंगी।
कुमति निवार सुमति के संगी॥
कंचन बरन बिराज सुबेसा।
कानन कुंडल कुंचित केसा॥
हाथ बज्र औ ध्वजा बिराजै।
काँधे मूँज जनेऊ साजै।
संकर सुवन केसरीनंदन।
तेज प्रताप महा जग बन्दन॥
विद्यावान गुनी अति चातुर।
राम काज करिबे को आतुर॥
प्रभु चरित्र सुनिबे को रसिया।
राम लखन सीता मन बसिया॥
सूक्ष्म रूप धरि सियहिं दिखावा।
बिकट रूप धरि लंक जरावा॥
भीम रूप धरि असुर सँहारे।
रामचंद्र के काज सँवारे॥
लाय सजीवन लखन जियाये।
श्रीरघुबीर हरषि उर लाये॥
रघुपति कीन्ही बहुत बड़ाई।
तुम मम प्रिय भरतहि सम भाई॥
सहस बदन तुम्हरो जस गावैं।
अस कहि श्रीपति कंठ लगावैं॥
सनकादिक ब्रह्मादि मुनीसा।
नारद सारद सहित अहीसा॥
जम कुबेर दिगपाल जहाँ ते।
कबि कोबिद कहि सके कहाँ ते॥
तुम उपकार सुग्रीवहिं कीन्हा।
राम मिलाय राज पद दीन्हा॥
तुम्हरो मंत्र बिभीषन माना।
लंकेस्वर भए सब जग जाना॥
जुग सहस्र जोजन पर भानू।
लील्यो ताहि मधुर फल जानू॥
प्रभु मुद्रिका मेलि मुख माहीं।
जलधि लाँघि गये अचरज नाहीं॥
दुर्गम काज जगत के जेते।
सुगम अनुग्रह तुम्हरे तेते॥
राम दुआरे तुम रखवारे।
होत न आज्ञा बिनु पैसारे॥
सब सुख लहै तुम्हारी सरना।
तुम रक्षक काहू को डर ना॥
आपन तेज सम्हारो आपै।
तीनों लोक हाँक तें काँपै॥
भूत पिसाच निकट नहिं आवै।
महाबीर जब नाम सुनावै॥
नासै रोग हरै सब पीरा।
जपत निरंतर हनुमत बीरा॥
संकट तें हनुमान छुड़ावै।
मन क्रम बचन ध्यान जो लावै॥
सब पर राम तपस्वी राजा।
तिन के काज सकल तुम साजा।
और मनोरथ जो कोई लावै।
सोइ अमित जीवन फल पावै॥
चारों जुग परताप तुम्हारा।
है परसिद्ध जगत उजियारा॥
साधु संत के तुम रखवारे।
असुर निकंदन राम दुलारे॥
अष्ट सिद्धि नौ निधि के दाता।
अस बर दीन जानकी माता॥
राम रसायन तुम्हरे पासा।
सदा रहो रघुपति के दासा॥
तुम्हरे भजन राम को पावै।
जनम-जनम के दुख बिसरावै॥
अन्तकाल रघुबर पुर जाई।
जहाँ जन्म हरि-भक्त कहाई॥
और देवता चित्त न धरई।
हनुमत सेइ सर्ब सुख करई॥
संकट कटै मिटै सब पीरा।
जो सुमिरै हनुमत बलबीरा॥
जै जै जै हनुमान गोसाईं।
कृपा करहु गुरुदेव की नाईं॥
जो सत बार पाठ कर कोई।
छूटहि बंदि महा सुख होई॥
जो यह पढ़ै हनुमान चालीसा।
होय सिद्धि साखी गौरीसा॥
तुलसीदास सदा हरि चेरा।
कीजै नाथ हृदय मँह डेरा॥

**दोहा :**

पवनतनय संकट हरन,
मंगल मूरति रूप।
राम लखन सीता सहित,
हृदय बसहु सुर भूप॥

# जगपती, गुणपती, गणपती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हजारो वर्षांपूर्वीपासून गणपती बाप्पा हे ग्लोबल आहेत आणि ते आजही आहेत. म्हणूनच त्यांना साऱ्या विश्वाचे अधिपती म्हणून ओळखले जाते. गणपती बाप्पांच्या अन्य देशांतील मूर्ती आणि श्रीगणेश उपासनेविषयीच्या खुणा याविषयी जाणून घेऊया. ब्रिटीश काळातील भारतात आजच्या पाकिस्तान, बांगलादेश, म्यानमार आणि श्रीलंका यांचा समावेश होता. त्या आधीच्या काळात साधारण १७ व्या शतकात अफगाणिस्तान, तिबेट, नेपाळ, जावा, सुमात्रा, कंबोडिया, व्हिएतनाम या प्रांतांना सुद्धा भारतच म्हटले जात असे. युरोपीय लोकांनी अफगाणिस्तानपासून व्हिएतनामपर्यंतच्या भागाला 'ईस्ट इंडिया' याच नावाने ओळखले. काही भाग वगळता हा संपूर्ण प्रांत युरोपीय देशांनी जिंकून घेतला व त्याला डच ईस्ट इंडिया, फ्रेंच ईस्ट इंडिया, ब्रिटिश ईस्ट इंडिया, पोर्तुगीज ईस्ट इंडिया अशी नावे दिली. त्याहीपूर्वीच्या काळात म्हणजे रोमन-ग्रीक काळापासून वास्को-द-गामा भारतात पोहोचेपर्यंत भारताचे दोन भाग केले जात. अफगाणिस्तानपासून गंगेपर्यंतचा प्रदेश व गंगेपासून पार पलीकडे पॅसिफिक महासागरापर्यंतचा प्रदेश अर्थात गंगेच्या अलीकडचा भारत आणि गंगेच्या पलीकडचा भारत. (त्यामध्ये चीन, कोरिया व जपान यांचा समावेश नव्हता.)

### गणपती मूर्तींच्या खुणा

जेव्हा महाकाय भारत असा अस्ताव्यस्त पसरला होता, त्या ८ व्या शतकात आदि शंकराचार्यांनी पंचायतन पूजा पद्धती घालून दिली. काहींच्या मते शंकराचार्यांच्या आधीच ही पद्धत सुरू झाली होती. पंचायतनमध्ये विष्णू, शिव, शक्ती, सूर्य आणि गणपती बाप्पा या पाच देवतांना एकत्र आणले गेले. यावरून ८ व्या शतकाच्या कितीतरी आधी गणपती लोकप्रिय देव होते, हे कळते. म्हणजे त्या वेळेपासूनच गणपती बाप्पा 'टॉप ५' देवतांपैकी एक होते. आणखी एक लक्षात घ्यायला हवे, की गणपती बाप्पा सर्वांचेच इतके लाडके होते की बौद्ध आणि जैन धर्मांनीसुद्धा त्यांना आपापल्या देवतांमध्ये स्थान दिले. बौद्ध धर्म जेथे पसरला तेथेसुध्दा गणपती बाप्पा पोहोचले. काही ठिकाणांचे गणपती बाप्पा हिंदूंनी तेथे नेले की बौध्दांनी हे कळत नाही. गणपती बाप्पांचे भक्त सर्वत्र पसरले होते. मग आजच्या अफगाणिस्तानमध्ये किंवा व्हिएतनाममध्ये गणपती बाप्पांची मूर्ती किंवा गणपती बाप्पांच्या उपासनेच्या खुणा मिळणे यामध्ये खरेतर काहीच आश्चर्य नाही.








गार्देझ महाविनायक
इस ५ वे शतक



शंकर धारा, अफगाणिस्तान
इस ४थे शतक



गणेश मूर्ती, काबुल बाजार

### अफगाणिस्तानमधील महाविनायकांची मूर्ती

अझरबैजानमधून पूर्वेकडे निघालो की इराण ओलांडून आपण अफगाणिस्तानमध्ये येतो. अफगाणिस्तानमध्ये गणपती बाप्पांच्या तीन संगमरवरी मूर्ती मिळाल्या आहेत. सकर दरा (जुने नाव - शंकर धारा) येथील मूर्ती दोन बुटुकल्या यक्षांच्या डोक्यावर हात ठेवून उभी आहे. गार्देझ येथील मूर्ती महाविनायकाची होती. ही मूर्ती खिंगल नावाच्या राजाने करवून घेतली होती. महाविनायकांची मूर्ती काबूलच्या संग्रहालयात होती. परंतु १९८० नंतर आलेल्या तालिबानी राजवटीत या संग्रहालयाची नासधूस केली गेली. त्यानंतर या मूर्तीचा ठावठिकाणा कळला नाही.

### रावळपिंडीचे श्रीगणेश मंदिर

अफगाणिस्तानमधून आणखी पूर्वेला पाकिस्तानमध्ये आलो की येथे अक्षरशः शेकडो हिंदू, बौध्द, जैन व शीख मंदिरे पाहायला मिळतात. श्रीकृष्ण मंदिर, श्रीराम मंदिर, शिव मंदिर, दुर्गा मंदिर, गुरुद्वारा, स्तूप, विहार यांची गणती नाही. पण सर्वच मंदिरांची आबाळ झाली आहे. स्वातंत्र्यानंतर कित्येक मंदिरे बंद आहेत. कितीतरी मंदिरांची पडझड झाली आहे. मंदिरांच्या भिंतींवर झाडे-वेली चढल्या आहेत. अशाच अवस्थेतील एक मंदिर आहे रावळपिंडीचे श्रीगणेश मंदिर.

### मध्य आशियात श्रीगणेशांचे दर्शन

पाकिस्तानमधून उत्तरेला काश्मीरच्या पलीकडून आपण मध्य आशियात पोहोचतो. येथेसुध्दा आपल्याला श्रीगणेशांचे दर्शन होते. तिबेट, खोतान, शिनझियांग, तुर्फान, चीनमधील दुनहुआंग गुंफा आणि मंगोलिया या सर्व ठिकाणी ५ व्या शतकापासून गणेशमूर्ती तसेच चित्र दिसतात. खोतान व मंगोलियामध्ये आधीच भगवान शिव यांचे उपासक होते. त्यामुळे शिवपुत्र श्रीगणेशांचे या ठिकाणी स्वागतच झाले. चीनमध्ये मात्र श्रीगणेश आणि भगवान शिव हे बौध्द धर्माबरोबर आलेले दिसतात.

### चीनमधील श्रीगणेश

चीनमध्ये दुनहुआंग येथे जवळजवळ ५०० गुंफा आहेत. यामधून भगवान गौतम बुद्धांची अतिशय सुंदर चित्र व शिल्प आहेत. यामध्ये दिसणारे श्रीगणेशांचे एक चित्र.

### जागतिक दस्तऐवजात श्रीगणेश ग्रंथाचा समावेश

अठराव्या शतकात या ग्रंथाच्या संचाचा मंगोलियन भाषेत अनुवाद केला गेला. मोंगोल 'तांजूर'मध्ये २२६ ग्रंथ आहेत. प्रत्येक ग्रंथ चंदनाच्या लाकडी पट्ट्यांमध्ये बांधला आहे. चिनी जाड कागदावर सुंदर अक्षरात बौध्द साहित्य लिहिले आहे आणि पानापानावर सुरेख चित्रे आहेत. मंगोल तांजूरला युनेस्कोने 'जागतिक दस्तऐवज' म्हणून मान्यता दिली आहे. या जागतिक दस्तऐवजात १४ ग्रंथ केवळ गणपती बाप्पांविषयी आहेत.

### जपानमधील श्रीगणेशांची रूपे

चीनमधून श्रीगणेश जपानमध्ये पोहोचले आणि चीनपेक्षा जपानमध्ये अधिक लोकप्रिय झाले. जपानमध्ये विनायक-तेन आणि कांगी-तेन अशी श्रीगणेशांची दोन रूपे दिसतात. सातव्या-आठव्या शतकात जपानमध्ये आलेल्या गणपती बाप्पांची पूजा आजही केली जाते. ही देवता सुख देणारी आहे. तिला 'अवलोकितेश्वर' असे म्हटले जाते. अवलोकितेश्वर हे सर्वांचे हित करणारे, संकटात मदत करणारे बौध्द देव. आणखी एक विशेष असे की कांगीतेनला चक्क तळलेल्या मोदकाचा नैवेद्य दाखविला जातो. येथे नेपाळ, बांगलादेश आणि श्रीलंका या सख्ख्या शेजाऱ्यांकडे गणपती बाप्पांच्या सुरेख मूर्ती व मंदिरे आहेत. नेपाळ व श्रीलंका येथे श्रीगणेश आजही पूजले जातात. नेपाळ व तिबेटमध्ये बौध्दांच्या तांत्रिक मार्गातील श्रीगणेशही दिसतात.

### आग्नेय देशांमध्ये श्रीगणेशांचे मंदिर

आग्नेय देशांमध्ये म्यानमार, थायलंड, कंबोडिया, मलेशिया, इंडोनेशिया, लाओस आणि व्हिएतनाम या देशांचा समावेश होतो. या देशांमध्ये इ.स. पहिल्या शतकाच्या दरम्यान हिंदू पोहोचले होते. त्यांच्याबरोबर हिंदू धर्म, ग्रंथ व देवताही पोहोचल्या होत्या. काही शतकांनंतर येथे बौध्द धर्माचे आगमन झाले. या सर्व ठिकाणी भगवान विष्णू, शिव आणि बुध्द यांची अगदी सरमिसळ झालेली दिसते. या सर्वांबरोबर गणपती बाप्पाही दिसतात. येथे गणपती बाप्पांच्या भरपूर मूर्ती पाहावयास मिळतात. त्यामुळे दगडाच्या आणि धातूच्यासुध्दा आहेत.

### सर्वांचे लाडके देव श्रीगणेश

देशोदेशी गणपती बाप्पांची प्रतिमा 'सुखकर्ता, दुःखहर्ता' अशीच आहे. त्यामुळे विशेष करून लांबचा प्रवास करणाऱ्या व्यापाऱ्यांना ते रक्षण करणारे म्हणून जवळचे आहेत. ते बुध्दिदाता आहेत, म्हणून देशोदेशीच्या विद्यार्थ्यांचे लाडके आहेत. कलांचे देव आहेत, तंत्राचे देव आहेत, विद्येचे देव आहेत. त्यामुळे ते कलाकारांचे, वैज्ञानिकांचे, तंत्रज्ञांचे, लेखकांचे आवडते आहेत.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून व धार्मिक साहित्यातून संकलीत केली आहे.)